# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/ 8393

दिनांक : २९ सप्टेंबर, २०१४/ - 01/10/14

मा. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था

विषय: शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये नवीन महाविद्यालये (व्यावसायिक / पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजुरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकषाबाबत...

संदर्भ: १.मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे पत्र क्र. अमवि / २०१३ / नवीन प्रस्ताव २०१४–२०१५ / मवि–२ व ३ / ६६६७ दि. १६ / ९ / २०१३

२.शासन निर्णय क्र. एनजीसी / २०१२ / (२४७/१२) / मशि–४, दि.२ / ९ / २०१३

महादय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय शासन निर्णयाची प्रत या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये नवीन महाविद्यालये (व्यावसायिक / पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांचे प्रस्ताव संदर्भीय शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून शासनास सादर करावयाचे आहेत. याची नोंद घेऊन सदर प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह विहित मुदतीत विद्यापीठास सादर करावेत.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं)

UNIVERSITY OF PUNE
(General Section)
28
Inward No. 808

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
फोन नं ०२०/२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६१२११५३

क्रमांक-अमवि/२०१३/नवीन प्रस्ताव २०१४-१५/मवि-२ व ३/६६६८ दिनांक - १८/९/२०१३

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व कुलसचिव, अकृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य.

Inward 11299
03/10/13

**विषय - सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविदयालये (व्यावसायिक/पारंपारिक),विदयाशाखा, अभ्यासक्रम/विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्याबाबत.**

**संदर्भ - शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२०१२/(२४७/१२)/मशि-४, दिनांक २ सप्टेंबर,२०१३**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णयाची प्रत यासोबत पुढील नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयामध्ये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविदयालये (व्यावसायिक/पारंपारिक), विदयाशाखा, अभ्यासक्रम/विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्यात आलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष सन २०१४-१५ पासून सुरु करावयाच्या नवीन महाविदयलये (व्यावसायिक/पारंपारिक), विदयाशाखा, अभ्यासक्रम/विषय व वाढीव तुकडयांचे प्रस्ताव शासनास सादर करताना संदर्भिय शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

२०/९/२०१३
(डॉ. प्र. रा. गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मवि-२ व ३ शाखेतील सर्व संबंधित कर्मचारी यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
13 SEP 2013
आवक क्रमांक- 326
शाखा- मशि2

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम/ विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१२/(२४७/१२)/ मशि ४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २ सप्टेंबर, २०१३

वाचा : १) शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/ (१९३/१०)/ मशि- ४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१०.
२) शासन निर्णय क्र. एनजीसी २०११/ (२४०/११)/ मशि- ४, दिनांक २५ऑक्टोबर, २०११.

**शासन निर्णय:**

नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाद्वारे निकष विहित करण्यात आलेले आहेत. त्या निकषात शासन निर्णय दि. २५.१०.२०११ अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. यात महाविद्यालयासाठी जागेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या निकषांचा विचार करण्यात आलेला आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी परिशिष्ट 'ब' मधील अनुक्रमांक १२ व १३ मध्ये नमुद केलेल्या सुधारित निकषांसह अर्ज मागविण्याची कार्यपध्दती व निकषांबाबत खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे.

१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (३) मधील तरतूदीनूसार सर्व अकृषि विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देवून अर्ज मागवावेत. बृहत आराखडया बाहेरच्या ठिकाणासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे स्विकारु नयेत.
२. सदर अर्ज दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयातील परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमून्यातच मागवावेत.
३. विद्यापीठांनी महाविद्यालयाकडून मान्यतेबाबतचे अर्ज मागवितांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने म्हणजेच व्ही.सी.डी. वर व नेहमीच्या पध्दतीने Hard Copy वर विद्यापीठांकडे सादर करण्याबाबतच्या सूचना जाहिरातीत देण्यात याव्यात. त्यामध्ये संस्थांमध्ये असलेल्या सोयी सुविधांचे व कर्मचारी/ शिक्षक यांच्या विषयीचे व्हिडिओ चित्रीकरण असावे.
४. प्रस्ताव घेतांना ते फक्त **DVB-TT-Surekh** या फॉन्टमध्येच घेतले जावेत व त्याच फॉन्ट मध्ये शासनास सादर करावेत.
५. याचिका क्र. ६३०७/२०१२ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. ८.८.२०१२ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत — "Learned AGP and counsel for the University to take instructions in respect of the norms, guidelines framed by the competent authorities, if any in respect of minimum requirement of infrastructural facilities to start colleges, till the management fulfills the criteria laid down in respect of the

infrastructural requirement within the stipulated period of five years, as per the State policy." मा. न्यायालयाने दिलेल्या सदर आदेशाच्या अनुषंगाने नवीन व्यावसायीक व पारंपारिक महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांचे प्रस्ताव मागवितांना व शिफारस करतांना शासनाच्या दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट 'ब' व 'क' मध्ये सुधारणा करुन एकच परिशिष्ट "ब" विहित करण्यात आले असून यासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब", "क" व "ड" ची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांचीच शिफारस विद्यापीठांनी करावी.

६. विद्यापीठांनी अर्ज स्विकारतांना व शिफारस करतांना दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयामधील तरतूदीनूसार कार्यवाही करावी व या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट " ब", "क" व "ड" मधील निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन त्या पुष्टयर्थ कागदपत्रे अर्जासोबत क्रमवार पध्दतीने जोडण्यात यावीत.

७. बायोटेक्नॉलॉजीच्या नवीन अभ्यासक्रम / विषयांना मान्यता देण्याचे प्रस्ताव वरील नमुद दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच डॉ. कोळसकर यांनी अशा प्रस्तावांच्या छाननीसाठी जे निकष ठरविले होते त्यानिकषांप्रमाणे छाननी करुन केवळ पात्र प्रस्ताव शिफारशीत करावे. सदर निकषांचा तक्ता "क" आणि "ड" येथे सोबत जोडण्यात येत आहे.

८. या शासन निर्णयाद्वारे शासन निर्णय दि. २५.१०.२०११ निरसीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ग.सं.कचरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य
४. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
५. मशि / विशि तील सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवडनस्ती मशि ४

शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१२/(२४७/१२)/ मशि ४, दिनांक : २ सप्टेंबर, २०१३ - परिशिष्ट 'ड'

संस्थेचे नाव :- 　　　　　　　　　　विद्यापीठाचे नाव :

ठिकाण :- 　　　　　　　　　　विद्याशाखा :-

| अ.क्र | तपासणी सूची | पूर्ततेचा "तपशिल" होय/नाही | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचा नवीन महाविद्यालय मंजूरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज | | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | | |
| ३ | महाविद्यालयाची मागणी करण्यापूर्वी संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले आहे काय? | | |
| ४ | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत | | |
| ५ | संस्थेचा मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची साक्षांकित प्रत. | | |
| ६ | किमान रु. ५०००००० चे फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत | | |
| ७ | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | | |
| ८ | संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ९ | संबंधित राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| १० | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टँम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र | | |
| ११ | १. **स्वत:ची जागा** - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालीका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | | |
| | २. **भाडयाची जागा** - अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| | ब) "ड" वर्ग महानगरपालीका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| | क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची" प्रत. | | |
| १२ | (अ) इमारत: (स्वत:ची) — संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र -अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे) | | |
| | १) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष | | |
| | १.२ कार्यालय | | |
| | १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | | |
| | १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.५पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | | |
| | १.६ जिवशास्त्र प्रयोगशाळा | | |
| | १.७ ग्रंथालय | | |
| | १.८ लेडीज रुम | | |
| | १.९ रेकॉर्ड रुम | | |

| | | |
|---|---|---|
| १.१० नॅक रुम | | |
| १.११ स्टाफ रुम | | |
| १.१२ सभागृह | | |
| १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | | |
| १.१४ टॉयलेट ब्लॉक | | |
| १.१५ व्हरांडा | | |
| १.१६ एन.सी.सी. रुम | | |
| १.१७ एन.एस.एस. रुम | | |
| २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | |
| २.२ विज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | |
| २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| **"ब" ( इमारत भाडयाची : (नोंदणीकृत भाडेकरार)** **(सोबतच्या प्रपत्र -अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे)** | | |
| १) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत | | |
| १.२ प्राचार्य कक्ष | | |
| १.२ कार्यालय | | |
| १.३ इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | | |
| १.४ रसायनशास्त्र प्रयोगशाळा | | |
| १.५ पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | | |
| १. ६ जिवशास्त्र प्रयोगशाळा | | |
| १.७ ग्रंथालय | | |
| १.८ लेडीज रुम | | |
| १.९ रेकॉर्ड रुम | | |
| १.१० नॅक रुम | | |
| १.११ स्टाफ रुम | | |
| १.१२ सभागृह | | |
| १.१३ मोठे व्याख्यान कक्ष | | |
| १.१४ टॉयलेट ब्लॉक | | |
| १.१५ व्हरांडा | | |
| १.१६ एन.सी.सी. रुम | | |
| १.१७ एन.एस.एस. रुम | | |
| २) २.१ पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती) | | |
| २.२ विज सुविधा (वीज देयकाची प्रत) | | |
| २.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| १२ (अ) व (ब) मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु. ५.०० लक्ष शिल्लक. | | |
| ग्रंथालयांत पुस्तकाची सुविधा (किमान ५०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) | | |
| प्रथमतः महाविद्यालय भाडयाच्या इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे त्या ठिकाणी स्वतःचे इमारतीमध्ये स्थलांतरित करत असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००९/(३०१/०९)/मशि-४, दि. २५/२/२००९ अन्वये ज्या संस्थेची यापूर्वीचे महाविद्यालये अस्तित्वात आहेत अशा संस्थेने नवीन महाविद्यालयाची मागणी केल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक /एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे. | | |

शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१२/(२४७/१२)/ मशि ४, दिनांक : २ सप्टेंबर, २०१३

## प्रपत्र - अ

## परिशिष्ट ब मधील अ.क्र. १२(अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ.क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकूण क्षेत्र | कला/विधी/शिक्षण शास्त्र | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २० x २५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३० x २० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २० x ३० | ६०० | -- | -- | ६०० (०) | -- | ६०० (०) | ६०० (०) | ६०० (०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थविज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० x १५ | ३०० | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) |
| ९) | एन.एस.एस. रुम | १ | २० x १५ | ३०० | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) | ३०० (०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रुम | १ | १० x १५ | १५० | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) | १५० (०) |
| १३) | स्टाफ रुम | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० x ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० x १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | कराडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०१ | ४२०० | ४६५० |
| | एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ) | | | १०२५० | ९२०० | ९५०० | १४००० | १२८०० | १३२०० | १३५०० | २०७५० |

## परिशिष्ट 'क'

## पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क्र | तपासणी सूची |
|---|---|
| १ | हा विषय सुरु करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे. |
| २ | सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरु झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच पास असणे आवश्यक आहे. |
| ३ | महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन "अ" श्रेणीचे असणे आवश्यक आहे. |
| ४ | सदर महाविद्यालयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे. |
| ५ | या महाविद्यालयात बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिज. |
| ६ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवयक आहे. |
| ७ | पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत. |
| ८ | विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एस्सी मायक्रोबायोलॉजी विषयाचा अधिव्याख्याता फूलटाईम पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी. केमेस्ट्री, सर्व्हेक्षी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल. |
| ९ | सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा पाहिजेत. |
| १० | विषय सुरु ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. |

## परिशिष्ट 'ड'

## पदव्युत्तर स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

| अ.क्र | तपासणी सूची |
|---|---|
| १ | मागणी केलेल्या महाविद्यालयात बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे. |
| २ | सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान अ श्रेणी असले पाहिजे. |
| ३ | विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे. |
| ४ | बी.एस्सी बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असला पाहिजे. |
| ५ | तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. |
| ६ | दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे. |
| ७ | किमान ६०० वर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात. |
| ८ | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |